# कुलगुरू तथा निवडणूक अपिलीय अधिकारी
# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

(महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदींन्वये विविध प्राधिकरणांच्या निवडणुका-२०२२)

विद्यापीठाने विविध प्राधिकरणांच्या निवडणुकांकरिता विविध गटांच्या उमेदवार याद्या छाननी करून जाहीर केल्या आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदींन्वये विविध प्राधिकरणांच्या निवडणुकांकरिता एकरूप परिनियम क्र. १/२०१७ मधील तरतूद क्र. १० (७) प्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयाच्या नाराजीने दाखल झालेल्या अपिलांची पूर्वसूचित सुनावणी दि. २५-११-२०२२ रोजी दु. १२.३० वा. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील व्यवस्थापन परिषद कक्षात घेण्यात आली. सदर सुनावणीस सर्व संबंधित अपिलकर्त्यांना तसेच ज्यांच्याबद्दल अपील केले आहे अशा सर्व उमेदवारांना उपस्थित राहण्याचे कळविण्यात आले होते.

प्राप्त प्रत्येक अपिलावर सुनावणी घेऊन मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| अ.क्र. | अपिलकर्त्याचे नाव | निर्वाचक गट | निर्णय |
|---|---|---|---|
| १ | डॉ. देशमुख गोविंद बालासाहेब | व्यवस्थापन प्रतिनिधी | डॉ. देशमुख गोविंद बालासाहेब हे स्वतः सुनावणीसाठी उपस्थित होते.<br>डॉ. देशमुख यांनी उमेदवारी अर्जासोबत सादर केलेले अभिलेख बारकाईने पाहिले. उमेदवारी अर्जासोबत जोडलेले नॅक प्रमाणपत्राची वैधता दि. २१ फेब्रुवारी, २०२२ रोजी समाप्त झाली आहे. नॅक वैधता समाप्त झाल्यानंतर नॅक करून घेण्यासंदर्भात कुठलीही प्रक्रिया सुरू असल्याबाबत कोणतेही कागदपत्रे सादर केलेले नाही. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४ ब दिनांक २९.०४.२०१७ रोजी राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने प्रसिद्ध केलेल्या अधिसुचनेतील अनुसुची क्रमांक १ मध्ये महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२)(त) प्रमाणे संलग्न महाविद्यालय अथवा परिसंस्थाच्या व्यवस्थापन प्रतिनिधीच्या गटाने त्यांच्या मधुन व्यवस्थान प्रतिनिधी निवडुन द्यावयाच्या अधिसभा सदस्यांकरीता पुढील पात्रता नमुद केली आहे.<br>*(क) --------*<br>*(ख)*<br>*(ग) राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे (नॅक) किंवा यथास्थिती, राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाचे वैध प्रमाणपत्र असलेले आणि अशा प्रमाणपत्राचा वैधता कालावधी समाप्त झाला नसेल असे किमान एक महाविद्यालय किंवा परिसंस्था अशा व्यवस्थापनाकडून चालविण्यात येणारे असावे.*<br>वरील नमुद पात्रतेची तरतुद पाहता व्यवस्थापन प्रतिनिधी गटातुन अधिसभेकरीता उमेदवारी दाखल करणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या महाविद्यालयाचे राष्ट्रीय मुल्यांकन (नॅक) व अधिस्वीकृती परिषदेचे किंवा यथास्थिती, राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाचे वैध अधिस्वीकृती वैध प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असल्याचे दिसते. अपीलार्थींनी सुनावणी दरम्यान त्यांच्या महाविद्यालयाचे राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेकडुन मुल्यांकनाची कार्यवाही सुरू झाली आहे हे दर्शविण्यासाठी दिनांक १५.११.२०२२ च्या ई-मेलची छायांकित प्रत व मुल्यांकनाकरीता आवश्यक असलेला शुल्क भरणा केल्याची पावती ची |

Dr.Babasaheb Ambedkar Marathwada University ★ Aurangabad ★

| | | | |
|---|---|---|---|
| | | | छायांकीत प्रत अभिलेखावर सादर केली त्याअर्थी, नॅकने दिनांक १०.११.२०२२ रोजी प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकाद्वारे त्यांच्या महाविद्यालयाचे नॅक मानांकन सद्यःस्थितीत वैध ग्राह्य धरावे लागेल असे माझे मत झाले आहे.<br>**करिता, मी निवडणूक अपिलीय अधिकारी म्हणून वरील नमूद कारणास्तव सदर अपील मंजुर करून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय रद्द करीत आहे. निवडणुक निर्णय अधिकाऱ्यास मी निर्देश देतो की, त्यांनी अपीलार्थीचे नामनिर्देशन वैध म्हणुन नमुद करावे.** |
| २ | डॉ. शिरसाठ शिवदास झुलाल | प्राचार्य गट | डॉ. शिरसाठ शिवदास झुलाल हे स्वतः सुनावणीसाठी उपस्थित होते.<br>डॉ. शिरसाठ यांनी उमेदवारी अर्जासोबत सादर केलेले अभिलेख बारकाईने पाहिले. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४ ब दिनांक २९.०४.२०१७ रोजी राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने प्रसिद्ध केलेल्या अधिसुचनेतील अनुसुची क्रमांक १ मध्ये महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२)(ण) प्रमाणे प्राचार्य गटाने त्यांच्यामधुन निवडुन द्यावयाच्या अधिसभा सदस्यांकरीता पुढील पात्रता नमुद केली आहे.<br>*(क) --------*<br>*(ख) राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे (नॅक) किंवा यथास्थिती, राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाचे वैध अधिस्वीकृती प्रमाणपत्र असलेले आणि अशा प्रमाणपत्राचा वैधता कालावधी समाप्त झाला नसेल अशा महाविद्यालयाचा प्राचार्य असावा.*<br>वरील नमुद पात्रतेची तरतुद पाहता प्राचार्य गटातुन अधिसभेकरीता उमेदवारी दाखल करणाऱ्या प्राचार्यांना त्यांच्या महाविद्यालयाचे राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे (नॅक) किंवा यथास्थिती, राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाचे वैध अधिस्वीकृती वैध प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असल्याचे दिसते.<br>प्रस्तुत अपीलार्थीने उमेदवारी अर्जासोबत जोडलेल्या नॅक मानंकन प्रमाणपत्राची वैधता दि. २९-१०-२०२२ रोजी समाप्त झाली आहे. परंतु उमेदवारी अर्जासोबत डॉ. शिरसाठ यांनी राष्ट्रीय मुल्यांकन सभेची अधिसुचना दिनांक १०.११.२०२२ नुसार नॅकच्या प्रक्रियेसाठी आय.आय.क्यु.ए. फॉर्म सादर करुन त्याकरीता रक्कम रु. २९,५००/- शुल्क भरणा केलेली पावती सोबत जोडली आहे. असे केल्याने वरील नमुद दिनांक १०.११.२०२२ च्या अधिसुचनेप्रमाणे त्यांच्या नॅक वैधता प्रमाणपत्राची मुदत अधिसुचना दिनांक ०९.०७.२०२० च्या अधिसुचनेप्रमाणे पुढे वाढविण्यात आली आहे. त्याअर्थी त्यांच्या महाविद्यालयाचे नॅक मानांकन सद्यःस्थितीत वैध ग्राह्य धरावे लागेल असे माझे मत झाले आहे.<br>**करिता, मी निवडणूक अपिलीय अधिकारी म्हणून वरील नमूद कारणास्तव सदर अपील मंजुर करून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय रद्द करीत आहे. निवडणुक निर्णय अधिकाऱ्यास मी निर्देश देतो की, त्यांनी अपीलार्थीचे नामनिर्देशन वैध म्हणुन नमुद करावे.** |
| ३ | डॉ. खंदारे भारत दत्तराव | प्राचार्य गट | डॉ. खंदारे भारत दत्तराव हे स्वतः सुनावणीसाठी उपस्थित होते.<br>डॉ. खंदारे यांनी उमेदवारी अर्जासोबत सादर केलेले अभिलेख बारकाईने पाहिले. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४ ब दिनांक |

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University ★ Aurangabad ★

| | | | |
|---|---|---|---|
| | | | २९.०४.२०१७ रोजी राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने प्रसिद्ध केलेल्या अधिसुचनेतील अनुसुची क्रमांक १ मध्ये महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२)(ण) प्रमाणे प्राचार्य गटाने त्यांच्यामधुन निवडुन द्यावयाच्या अधिसभा सदस्यांकरीता पुढील पात्रता नमुद केली आहे.<br>*(क) --------*<br>*(ख) राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे (नॅक) किंवा यथास्थिती, राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाचे वैध अधिस्वीकृती प्रमाणपत्र असलेल्या आणि अशा प्रमाणपत्राचा वैधता कालावधी समाप्त झाला नसेल अशा महाविद्यालयाचा प्राचार्य असावा.*<br>वरील नमुद पात्रतेची तरतुद पाहता प्राचार्य गटातुन अधिसभेकरीता उमेदवारी दाखल करणाऱ्या प्राचार्यांना त्यांच्या महाविद्यालयाचे राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे (नॅक) किंवा यथास्थिती, राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाचे वैध अधिस्वीकृती वैध प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असल्याचे दिसते.<br>प्रस्तुत अपीलार्थीने उमेदवारी अर्जासोबत जोडलेल्या नॅक मानंकन प्रमाणपत्राची वैधता दि. ०४-११-२०२१ रोजी समाप्त झाली आहे. आज रोजी सुनावणी दरम्यान अपीलार्थीने त्यांच्या महाविद्यालयाची नॅक मुल्यांकनाची कार्यवाही सुरु झाल्याचे अभिलेख सादर केले. त्याअर्थी, नॅकने दिनांक १०.११.२०२२ रोजी प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकाद्वारे त्यांच्या महाविद्यालयाचे नॅक मानांकन सद्यःस्थितीत वैध ग्राह्य धरावे लागेल असे माझे मत झाले आहे.<br>**करिता, मी निवडणूक अपिलीय अधिकारी म्हणून वरील नमूद कारणास्तव सदर अपील मंजुर करून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय रद्द करीत आहे. निवडणुक निर्णय अधिकाऱ्यास मी निर्देश देतो की, त्यांनी अपीलार्थीचे नामनिर्देशन वैध म्हणुन नमुद करावे.** |
| ४ | डॉ. मुळे संजीवनी श्रीकांत | प्राचार्य गट | डॉ. मुळे संजीवनी श्रीकांत हे स्वतः सुनावणीसाठी उपस्थित होत्या.<br>डॉ. मुळे यांनी उमेदवारी अर्जासोबत सादर केलेले अभिलेख बारकाईने पाहिले. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४ ब दिनांक २९.०४.२०१७ रोजी राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने प्रसिद्ध केलेल्या अधिसुचनेतील अनुसुची क्रमांक १ मध्ये महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२)(ण) प्रमाणे प्राचार्य गटाने त्यांच्यामधुन निवडुन द्यावयाच्या अधिसभा सदस्यांकरीता पुढील पात्रता नमुद केली आहे.<br>*(क) --------*<br>*(ख) राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे (नॅक) किंवा यथास्थिती, राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाचे वैध अधिस्वीकृती प्रमाणपत्र असलेल्या आणि अशा प्रमाणपत्राचा वैधता कालावधी समाप्त झाला नसेल अशा महाविद्यालयाचा प्राचार्य असावा.*<br>वरील नमुद पात्रतेची तरतुद पाहता प्राचार्य गटातुन अधिसभेकरीता उमेदवारी दाखल करणाऱ्या प्राचार्यांना त्यांच्या महाविद्यालयाचे राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे (नॅक) किंवा यथास्थिती, राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाचे वैध अधिस्वीकृती वैध प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असल्याचे दिसते. |

Dr.Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

| | | | |
|---|---|---|---|
| | | | प्रस्तुत अपीलार्थीने सुनावणी दरम्यान नॅकने शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना मुल्यांकन व मानंकन आवश्यक नसल्याचे परिपत्रक दिनांक १६.०५.२०१८ व ०३.०५.२०२२ सादर केले व त्याद्वारे नॅकची तरतुद त्यांच्या महाविद्यालयास लागु नसल्याचे नमुद केले परंतु शिक्षणशास्त्र महाविद्यालयास नॅक अनिवार्य नसले तरी एन.सी.टी.ई. च्या निर्देशानुसार बी.एड. महाविद्यालयास पी.ए.आर. चे मानांकन आवश्यक आहे. अपीलार्थीने सादर केलेल्या पी.ए.आर. च्या दस्तावरुन सदर मानांकनाविषयी कोणताही बोध होत नाही.<br>**करीता मी निवडणुक अपीलीय अधिकारी म्हणुन वरील नमुद कारणास्तव सदर अपील खारीज करुन निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय कायम करीत आहे.** |
| ५ | डॉ. विधाते हरिदास गोपीनाथ | प्राचार्य गट | डॉ. विधाते हरिदास गोपीनाथ हे स्वतः सुनावणीसाठी उपस्थित होते.<br>डॉ. विधाते यांनी उमेदवारी अर्जासोबत सादर केलेले अभिलेख बारकाईने पाहिले. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४ ब दिनांक २९.०४.२०१७ रोजी राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने प्रसिद्ध केलेल्या अधिसुचनेतील अनुसुची क्रमांक १ मध्ये महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२)(ण) प्रमाणे प्राचार्य गटाने त्यांच्यामधुन निवडुन द्यावयाच्या अधिसभा सदस्यांकरीता पुढील पात्रता नमुद केली आहे.<br>*(क) --------*<br>*(ख) राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे (नॅक) किंवा यथास्थिती, राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाचे वैध अधिस्वीकृती प्रमाणपत्र असलेल्या आणि अशा प्रमाणपत्राचा वैधता कालावधी समाप्त झाला नसेल अशा महाविद्यालयाचा प्राचार्य असावा.*<br>वरील नमुद पात्रतेची तरतुद पाहता प्राचार्य गटातुन अधिसभेकरीता उमेदवारी दाखल करणाऱ्या प्राचार्यांना त्यांच्या महाविद्यालयाचे राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे (नॅक) किंवा यथास्थिती, राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाचे वैध अधिस्वीकृती वैध प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असल्याचे दिसते.<br>प्रस्तुत अपीलार्थीने उमेदवारी अर्जासोबत जोडलेल्या नॅक मानंकन प्रमाणपत्राची वैधता दि. २९-१०-२०२२ रोजी समाप्त झाली आहे. परंतु उमेदवारी अर्जासोबत डॉ. विधाते यांनी राष्ट्रीय मुल्यांकन सभेची अधिसुचना दिनांक १०.११.२०२२ नुसार नॅकच्या प्रक्रियेसाठी आय.आय.क्यु.ए. फॉर्म सादर करुन त्याकरीता शुल्क भरणा करून त्याची पावती दि. १३-०८-२०२२ रक्कम रु. २९५११/- ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. असे केल्याने वरील नमुद दिनांक १०.११.२०२२ च्या अधिसुचनेप्रमाणे त्यांच्या नॅक वैधता प्रमाणपत्राची मुदत अधिसुचना दिनांक ०९.०७.२०२० च्या अधिसुचनेप्रमाणे पुढे वाढविण्यात आली आहे. त्याअर्थी त्यांच्या महाविद्यालयाचे नॅक मानांकन सद्यःस्थितीत वैध ग्राह्य धरावे लागेल असे माझे मत झाले आहे.<br>**करिता, मी निवडणूक अपिलीय अधिकारी म्हणून वरील नमूद कारणास्तव सदर अपील मंजुर करून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय रद्द करीत आहे. निवडणुक निर्णय अधिकाऱ्यास मी निर्देश देतो की, त्यांनी अपीलार्थीचे नामनिर्देशन वैध म्हणुन नमुद करावे.** |

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | डॉ. अशोक मारुती कोरडे | अध्यापक (अधिसभा) | अपीलार्थी डॉ. अशोक मारुती कोरडे सुनावणीस अनुपस्थित होते.<br>अपीलार्थीनी अध्यापक गटातुन विद्यापीठाच्या अधिसभेवर निवडुन यावयाच्या सदस्यांच्या निवडणुकीकरीता नामनिर्देशन पत्र दाखल केले असुन सदर नामनिर्देशन पत्रातील घोषणा पत्रावर स्वाक्षरी करुन दिनांक नमुद केलेले नाही म्हणुन निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांचे नामनिर्देशनपत्र अवैध ठरविले आहे. अपीलार्थीनी सदर अपील दाखल करुन त्यांनी नामनिर्देश पत्रावर दिनांक नमुद करणे आवश्यक असल्याचे आवश्यकच आहे असे वाटत नाही असे नमुद करुन अपील मंजुर करावे म्हणुन विनंती केली आहे.<br>याबाबत मी अपील, अपीलार्थीचे नामनिर्देशन पत्र व निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी सादर केलेले अभिलेख बारकाईने पाहिले. एकरुप परिनियम क्रं.१/१७ मधील तरतुदींचे वाचन केले असता सर्व प्रकारच्या गणांमधुन नामनिर्देशनपत्र सादर करतांना सदर व्यक्तीने नामनिर्देशन पत्रावर स्वाक्षरी व दिनांक लिहुन समिती दिल्याखेरीज निवडणुकतील उमेदवार म्हणुन त्याचे नामनिर्देशन केले जाणार नाही असे स्पष्टपणे नमुद आहे. जोपर्यंत सदर नामनिर्देशन पत्रावर उमेदवार स्वाक्षरी सोबत दिनांक नमुद करणार नाही ते नामनिर्देशन पत्र परिनियमातील तरतुदींप्रमाणे मुळातच कोणत्याही परिस्थितीत ग्राह्य धरला जाऊ शकत नाही. त्याअर्थी निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी अपीलार्थीचे नामनिर्देशन पत्र अवैध ठरवीले आहे यात मला काहीही गैर दिसुन येत नाही.<br>**करीता मी निवडणुक अपीलीय अधिकारी म्हणुन वरील नमुद कारणास्तव सदर अपील खारीज करुन निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय कायम करीत आहे.** |
| ७ | शेख शरफोद्दीन फक्रोद्दीन | अध्यापक (अधिसभा) | अपीलार्थी शेख शरफोद्दीन फक्रोद्दीन सुनावणीस अनुपस्थित होते.<br>सदर अपिलार्थीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम २८ (२) प्रमाणे अधिसभेवर निवडून द्यावयाच्या अध्यापक गटातील सदस्यांच्या निवडणुकीकरिता नामनिर्देशनपत्र दाखल केले आहे. परंतु सदर नामनिर्देशन पत्रावर अनेक बाबी न लिहिता अपूर्ण ठेवल्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांचे नामनिर्देशन अवैध ठरविले आहे. सदर नाराजीने प्रस्तुत अपील सादर केले आहे.<br>याबाबत अपिलार्थीचे अपील, त्याचे नामनिर्देशनपत्र याची बारकाईने पाहणी केली. सदर अपिलार्थीच्या नामनिर्देशनपत्रातील पान क्र. १ वर त्याने फोन क्रमांक, ई-मेल आयडी नमूद केलेला नाही. व याशिवाय विशेषकरून पान क्र. २ वर त्याच्या महाविद्यालयाचे नाव व पत्ता नूद केला नाही. विद्यापीठातील विविध प्राधिकरणाच्या निवडणुकीकरिता राज्य शासनाने जारी केलेल्या परिनियमातील तरतुदी पाहता निवडणुकीकरिता सादर केलेले नामनिर्देशनपत्र अपूर्ण असता कामा नये असे माझे मत आहे. करिता निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी अपिलार्थीचे नामनिर्देशनपत्र अवैध ठरवून काहीही गैर केलेले नाही असे मला वाटते.<br>**करिता, मी निवडणूक अपिलीय अधिकारी म्हणून प्रस्तुत अपील खारीज करतो व निवडणूक निर्णय अधिकारी यांचा निर्णय कायम करतो.** |

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University ★ Aurangabad ★

<table>
<tr><td>८</td><td>वनंजे प्रशांतकुमार विठ्ठलराव</td><td>अध्यापक (अधिसभा)</td><td rowspan="18"><u>अनुक्रमांक ८ ते २५ करीता आदेश</u><br>सुनावणी करीता अपीलार्थी हजर आहे.<br><br>सदर अपिलार्थींनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतुदींप्रमाणे विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांवर निवडून द्यावयाच्या निवडणुकीकरिता राखीव संवर्गातून नामनिर्देशनपत्रे दाखल केली आहेत. परंतु सदर नामनिर्देशनपत्रे राखीव संवर्गातून दाखल केले असल्याने त्यांचा समावेश राखीव संवर्गात होतो हे दर्शविण्यासाठी जात प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक होते परंतु तसे न केल्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने त्यांचे अर्ज अवैध ठरविले आहेत.<br><br>याबाबत अपिलार्थींनी अपिलाच्या विहित मुदतीत त्यांचे जात वैधता प्रमाणपत्राची छायांकित प्रत अपिलासोबत जोडून सादर केली आहे. त्याअर्थी त्यांचा राखीव संवर्गात समावेश होतो हे स्पष्टपणे दिसून येते.<br><br>करिता सदर अपिलार्थींचे अपील मी मंजूर करीत असून त्यांच्या बाबतीत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिलेला निर्णय रद्द करीत आहे.<br><br>करिता, मी निवडणूक अपिलीय अधिकारी म्हणून वरील नमूद कारणास्तव सदर अपील मंजुर करून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय रद्द करीत आहे. निवडणुक निर्णय अधिकाऱ्यास मी निर्देश देतो की, त्यांनी अपीलार्थींचे नामनिर्देशन वैध म्हणुन नमुद करावे.</td></tr>
<tr><td>९</td><td>खापर्डे वैशाली सोविंद</td><td>विद्यापीठ अध्यापक</td></tr>
<tr><td>१०</td><td>मोहिते बबन मुरलीधर</td><td>अभ्यासमंडळ (भूगोल)</td></tr>
<tr><td>११</td><td>मुरुमकर वैभव देविदास</td><td>अभ्यासमंडळ (पदार्थविज्ञान)</td></tr>
<tr><td>१२</td><td>थोरवे उद्धव बाबासाहेब</td><td>अभ्यासमंडळ (मराठी)</td></tr>
<tr><td>१३</td><td>भगत इंद्रजीत रामदास</td><td>अभ्यासमंडळ (बिझनेस इकॉनॉमिक्स)</td></tr>
<tr><td>१४</td><td>छानवाल ईश्वर लखीचंद</td><td>अभ्यासमंडळ (बिझनेस इकॉनॉमिक्स)</td></tr>
<tr><td>१५</td><td>भुक्तार अनिल एस.</td><td>अभ्यासमंडळ (वनस्पतिशास्त्र)</td></tr>
<tr><td>१६</td><td>चव्हाण अंकुश अंबादास</td><td>अभ्यासमंडळ (राज्यशास्त्र)</td></tr>
<tr><td>१७</td><td>विधाते रघुनाथ गोपीनाथ</td><td>अभ्यासमंडळ (पदार्थविज्ञान)</td></tr>
<tr><td>१८</td><td>राजपंगे माधव गणपती</td><td>अभ्यासमंडळ (भूगोल)</td></tr>
<tr><td>१९</td><td>बोडखे गोपीनाथ पांडुरंग</td><td>अभ्यासमंडळ (मराठी)</td></tr>
<tr><td>२०</td><td>जाधव पुष्पलता नारायणराव</td><td>अभ्यासमंडळ (सूक्ष्मजीवशास्त्र)</td></tr>
<tr><td>२१</td><td>निकाळजे जीवनज्योति विश्वनाथ</td><td>अभ्यासमंडळ (गृहविज्ञान)</td></tr>
<tr><td>२२</td><td>वंजारी मनिषा पांडुरंग</td><td>अभ्यासमंडळ (गृहविज्ञान)</td></tr>
<tr><td>२३</td><td>कुरपटवार लक्ष्मीनारायण चंद्रय्या</td><td>अभ्यासमंडळ (बिझनेस इकॉनॉमिक्स)</td></tr>
<tr><td>२४</td><td>म्हस्के दिलीप सिताराम</td><td>अभ्यासमंडळ (समाजशास्त्र)</td></tr>
<tr><td>२५</td><td>मरकळे अनंत दादाराव</td><td>अभ्यासमंडळ (इतिहास)</td></tr>
<tr><td>२६</td><td>पठाण मनोरखा रशीदखा</td><td>अध्यापक (अधिसभा)</td><td>अपीलार्थी पठाण मनोरखा रशीदखा हे स्वतः सुनावणीसाठी उपस्थित होते.<br>सदर अपिलार्थीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम २८ (२) प्रमाणे अधिसभेवर अध्यापक गटातून निवडून येण्यासाठी नामनिर्देशनपत्र सादर केले आहे. सदर</td></tr>
</table>

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad

| | | | |
|---|---|---|---|
| | | | नामनिर्देशनपत्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी पुरेसा अनुभव नसल्याकारणाने अवैध ठरविले आहे. अपिलार्थींनी त्यांचेकडे पुरेसा अनुभव असल्याचे नमूद करून त्यांचे अपील मंजूर करण्याची विनंती केली.<br>मी याबाबत अपील व नामनिर्देशनपत्र बारकाईने तपासले. राज्य शासनाने जारी केलेल्या दि. २९-०४-२०१७ च्या एकरूप परिनियमातील तरतुदीनुसार किमान दहा वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असणे आवश्यक आहे. परंतु अपिलार्थींनी सादर केलेल्या कागदपत्रांची पाहणी केली असता त्यांचा किमान १० वर्षाचा अनुभव पूर्ण होत नाही.<br>**करिता, मी निवडणूक अपिलीय अधिकारी म्हणून वरील नमूद कारणास्तव सदर अपील खारीज करून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय कायम करीत आहे.** |
| २७ | डोंगळीकर चेतना विश्वनाथ | अभ्यासमंडळ (गृहविज्ञान) | अपीलार्थी डोंगळीकर चेतना विश्वनाथ सुनावणीस स्वतः उपस्थित आहेत.<br>सदर अपिलार्थीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ४० (२) (ग) प्रमाणे अभ्यासमंडळासाठी नामनिर्देशनपत्र सादर केले आहे. सदर नामनिर्देशनपत्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी किमान पाच वर्षाचा विद्यापीठाच्या परीक्षेशी संबंधित कामकाजाचा अनुभव जोडला नसल्याकारणाने अवैध ठरविले आहे. अपिलार्थींनी त्यांचेकडे पुरेसा अनुभव असल्याचे नमूद करून त्यांचे अपील मंजूर करण्याची विनंती केली.<br>आज रोजी सुनावणी दरम्यान अपीलार्थीने त्यांच्याकडे विद्यापीठाच्या परीक्षेशी संबंधीत कामकाजाचा किमान पाच वर्षाचा अनुभव असल्याचे प्रमाणपत्र अभिलेखावर सादर केले. सदर प्रमाणपत्र मी तपासले व ते प्रमाणपत्र योग्य असल्याची माझी खात्री झाल्याने प्रस्तुत अपील मंजुर करणे आवश्यक आहे असे माझे मत झाले आहे.<br>**करिता, मी निवडणूक अपिलीय अधिकारी म्हणून वरील नमूद कारणास्तव सदर अपील मंजुर करून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय रद्द करीत आहे. निवडणुक निर्णय अधिकाऱ्यास मी निर्देश देतो की, त्यांनी अपीलार्थींचे नामनिर्देशन वैध म्हणुन नमुद करावे.** |
| २८ | खंदाट माया संजयराव | अभ्यासमंडळ (गृहविज्ञान) | अपीलार्थी खंबाट माया संजयराव सुनावणीस स्वतः उपस्थित आहेत.<br>सदर अपिलार्थीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ४० (२) (ग) प्रमाणे अभ्यासमंडळासाठी नामनिर्देशनपत्र सादर केले आहे. सदर नामनिर्देशनपत्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी नियुक्ती आदेश जोडला नसल्याकारणाने अवैध ठरविले आहे. अपिलार्थींनी अपिलासोबत नियुक्तीपत्र सादर करून त्यांचे अपील मंजूर करण्याची विनंती केली. आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थींनी त्यांचे नियुक्तीपत्राची छायांकित प्रत प्रत्यक्ष सादर केली. सदर दस्त मी पाहिले व ते योग्य असल्याची माझी खात्री झाल्याने प्रस्तुत अपील मंजुर करणे आवश्यक आहे असे माझे मत झाले आहे.<br>**करिता, मी निवडणूक अपिलीय अधिकारी म्हणून वरील नमूद कारणास्तव सदर अपील मंजुर करून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय रद्द करीत आहे. निवडणुक निर्णय अधिकाऱ्यास मी निर्देश देतो की, त्यांनी अपीलार्थींचे नामनिर्देशन वैध म्हणुन नमुद करावे.** |

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University ★ Aurangabad ★

| | | | |
|---|---|---|---|
| २९ | साखरे देवानंद लिंबराज | अभ्यासमंडळ (फिजिकल एज्युकेशन बी.पी.एड. कॉलेजेस) | अपीलार्थी डॉ. साखरे देवानंद लिंबराज सुनावणीस अनुपस्थित आहेत.<br>अपीलार्थींनी अभ्यासमंडळ (फिजिकल एज्युकेशन बी.पी.एड.कॉलेजेस) निवडणुकीकरीता नामनिर्देशन पत्र दाखल केले असुन सदर नामनिर्देशन पत्रातील घोषणा पत्रावर स्वाक्षरी करुन दिनांक नमुद केलेले नाही म्हणुन निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांचे नामनिर्देशनपत्र अवैध ठरविले आहे. अपीलार्थींनी सदर अपील दाखल करुन त्यांनी नामनिर्देशन पत्रावर दिनांक नमुद करणे आवश्यक असल्याचे आवश्यकच आहे असे वाटत नाही असे नमुद करुन अपील मंजुर करावे म्हणुन विनंती केली आहे.<br>याबाबत मी अपील, अपीलार्थीचे नामनिर्देशन पत्र व निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी सादर केलेले अभिलेख बारकाईने पाहिले. एकरुप परिनियम क्रं.१/१७ मधील तरतुदींचे वाचन केले असता सर्व प्रकारच्या गणांमधुन नामनिर्देशनपत्र सादर करतांना सदर व्यक्तीने नामनिर्देशन पत्रावर स्वाक्षरी व दिनांक लिहुन समिती दिल्याखेरीज निवडणुकतील उमेदवार म्हणुन त्याचे नामनिर्देशन केले जाणार नाही असे स्पष्टपणे नमुद आहे. जोपर्यंत सदर नामनिर्देशन पत्रावर उमेदवार स्वाक्षरी सोबत दिनांक नमुद करणार नाही ते नामनिर्देशन पत्र परिनियमातील तरतुदींप्रमाणे मुळातच कोणत्याही परिस्थितीत ग्राह्य धरला जाऊ शकत नाही. त्याअर्थी निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी अपीलार्थीचे नामनिर्देशन पत्र अवैध ठरवीले आहे यात मला काहीही गैर दिसुन येत नाही.<br>**करीता मी निवडणुक अपीलीय अधिकारी म्हणुन वरील नमुद कारणास्तव सदर अपील खारीज करुन निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय कायम करीत आहे.** |
| ३० | पठाण अलिया कौसर | अभ्यासमंडळ (उर्दू) | अपीलार्थी पठाण अलिया कौसर ह्या सुनावणीसाठी स्वतः उपस्थित आहेत.<br>अपीलार्थीने नामनिर्देशनपत्रामध्ये सुचकाचा मतदार अनुक्रमांक चुकीचा नमूद केलेला आहे. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांचा अर्ज अवैध ठरविला आहे.<br>अपिलार्थीने अपील दाखल करून सुचकाचा चुकलेला मतदार अनुक्रमांक ग्राह्य धरण्याची विनंती केली आहे. एकरूप परिनियम १/१७ मधील तरतूद क्र. १० (३) अन्वये मतदाराचा, सूचक व अनुमोदक यांचा अनुक्रमांक असणे आवश्यक आहे. नामनिर्देशनपत्राची तपासणी केलेली असता स्वतःचा मतदार अनुक्रमांक चुकीचा नमूद केल्याचे दिसून येते.<br>**करीता मी निवडणुक अपीलीय अधिकारी म्हणुन वरील नमुद कारणास्तव सदर अपील खारीज करुन निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय कायम करीत आहे.** |
| ३१ | जाधव विलास श्रीरंग | अभ्यासमंडळ (इतिहास) | अपीलार्थी जाधव विलास श्रीरंग हे सुनावणीसाठी स्वतः उपस्थित आहेत.<br>अपिलार्थीने नामनिर्देशनपत्रामध्ये सूचक व अनुमोदक यांच्या सही खाली दिनांक नमुद केलेली नाही. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांचा अर्ज अवैध ठरविला आहे.<br>अपिलार्थीने अपील दाखल करून सदर बाब तांत्रीक समजुन |

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University ★ Aurangabad ★

| | | | |
|---|---|---|---|
| | | | त्यांचे नामनिर्देशनपत्र वैध ठरविण्याची विनंती केली. एकरूप परिनियम १/१७ मधील तरतूद क्र. १० (३) अन्वये नामनिर्देशनपत्रावर सुचक व अनुमोदक यांना सही करुन दिनांक नमुद करणे आवश्यक आहे. नामनिर्देशनपत्राची तपासणी केलेली असता निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय योग्य असल्याचे दिसुन येते.<br>**करीता मी निवडणुक अपीलीय अधिकारी म्हणुन वरील नमुद कारणास्तव सदर अपील खारीज करुन निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय कायम करीत आहे.** |
| ३२ | जाधव अनंत विठ्ठलराव | अभ्यासमंडळ (इंग्रजी) | अपीलार्थी जाधव अनंत विठ्ठलराव हे सुनवणीसाठी स्वतः उपस्थित आहेत.<br>सदर अपिलार्थीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ४० (२) (ग) प्रमाणे अभ्यासमंडळासाठी नामनिर्देशनपत्र सादर केले आहे. सदर नामनिर्देशनपत्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी नियुक्ती आदेश जोडला नसल्याकारणाने अवैध ठरविले आहे. अपिलार्थींनी अपिलासोबत नियुक्तीपत्र सादर करून त्यांचे अपील मंजूर करण्याची विनंती केली.<br>याबाबत अपिलार्थींनी अपिलाच्या विहित मुदतीत त्यांचे नियुक्तीपत्राची छायांकित प्रत अपिलासोबत जोडून सादर केली आहे. करिता सदर अपिलार्थीचे अपील मी मंजूर करीत असून त्यांच्या बाबतीत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिलेला निर्णय रद्द करीत आहे.<br>**करीता मी निवडणूक अपिलीय अधिकारी म्हणून निवडणूक अधिकाऱ्यांना निर्देश देतो की, त्यांनी सदर अपिलार्थीचे नामनिर्देशन वैध दर्शवावे.** |
| ३३ | शेख इमरान रमझान | अभ्यासमंडळ (शैक्षणिक तत्त्वज्ञान) | अपीलार्थी डॉ. शेख इमरान रमझान सुनावणीस अनुपस्थित आहेत. अपीलार्थींनी अभ्यासमंडळ (शैक्षणिक तत्त्वज्ञान) निवडणुकीकरीता नामनिर्देशन पत्र दाखल केले असुन सदर नामनिर्देशन पत्रावर अनुमोदन देणाऱ्या मतदाराच्या स्वाक्षरी सोबत दिनांक नमुद नाही म्हणुन निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांचे नामनिर्देशनपत्र अवैध ठरविले आहे.<br>याबाबत मी अपील, अपीलार्थीचे नामनिर्देशन पत्र व निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी सादर केलेले अभिलेख बारकाईने पाहिले. एकरुप परिनियम क्रं.१/१७ मधील तरतुदींचे वाचन केले असता सर्व प्रकारच्या गणांमधुन नामनिर्देशनपत्र सादर करतांना सदर व्यक्तीने नामनिर्देशन पत्रावर स्वतः, सुचक व अनुमोदक यांच्या स्वाक्षरीसह दिनांक लिहुन संमती दिल्याखेरीज निवडणुकतील उमेदवार म्हणुन त्याचे नामनिर्देशन केले जाणार नाही असे स्पष्टपणे नमुद आहे. जोपर्यंत सदर नामनिर्देशन पत्रावर उमेदवार, सुचक व अनुमोदक स्वाक्षरी सोबत दिनांक नमुद करणार नाही ते नामनिर्देशन पत्र परिनियमातील तरतुदींप्रमाणे मुळातच कोणत्याही परिस्थितीत ग्राह्य धरला जाऊ शकत नाही. त्याअर्थी निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी अपीलार्थीचे नामनिर्देशन पत्र अवैध ठरवीले आहे यात मला काहीही गैर दिसुन येत नाही.<br>**करीता मी निवडणुक अपीलीय अधिकारी म्हणुन वरील नमुद कारणास्तव सदर अपील खारीज करुन निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय कायम करीत आहे.** |

Dr.Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

| | | | |
|---|---|---|---|
| ३४ | कोनाळे बालाजी एकनाथ | अभ्यासमंडळ (हिंदी) | अपीलार्थीने नामनिर्देशनपत्रामध्ये मतदाराचा मतदार अनुक्रमांक चुकीचा नमुद केलेला आहे. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांचा अर्ज अवैध ठरविला आहे.<br>अपीलार्थीने अपील दाखल करुन चुकलेला मतदाराचा मतदार अनुक्रमांक ग्राह्य धरण्याची विनंती केली आहे.<br>एकरुप परिनियम १/१७ मधील तरतुद क्र.१०(३) अन्वये उमेदवार, सूचक व अनुमोदक यांचा अनुक्रमांक असणे आवश्यक आहे.<br>नामनिर्देशपत्राची तपासणी केलेली असता मतदाराचा मतदार अनुक्रमांक चुकीचा नमुद केल्याचे दिसुन येते.<br>**करीता मी निवडणुक अपीलीय अधिकारी म्हणुन वरील नमुद कारणास्तव सदर अपील खारीज करुन निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय कायम करीत आहे.** |
| ३५ | डॉ. सय्यद इकबाल मजाज सय्यद अली हादी – त्रयस्थपक्ष यांचे अध्यापक गटातील डॉ. शंकर भगवान अंभोरे यांच्या उमेदवारी अर्जावर आक्षेप | अध्यापक (अधिसभा) | अपीलार्थी डॉ. सय्यद इकबाल मजाज सय्यद अली हादी हे सुनावणीसाठी अनुपस्थित आहेत.<br>महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२)(द) अनुसार अधिसभेवर निवडुन येणाऱ्या अध्यापक गटातील सदस्यांच्या निवडणुकीकरीता अध्यापक डॉ. शंकर भगवान अंभोरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. सदर उमेदवारी अर्जावर त्रयस्थपक्ष डॉ. सय्यद इकबाल मजाज सय्यद अली हादी यांनी डॉ. अंभोरे यांच्या निगडीत काही फौजदारी प्रकरणांची माहिती नमुद करुन आक्षेप नोंदविला आहे व त्याद्वारे त्यांचा उमेदवारी अर्ज अवैध ठरवावा अशी विनंती केली आहे. याबाबत महाराष्ट्र शासनाने दिनांक १७ मे, २०१७ च्या अधिसुचनेद्वारे जारी केलेल्या परिनियम-१/२०१७ मधील तरतुद क्रमांक १०(७) पुढील प्रमाणे आहे.<br>***१०. नामनिर्देशनपत्रे :- -------***<br>*(७) नामनिर्देशन पत्राच्या वैधतेच्या संदर्भात कोणताही वाद किंवा शंका असल्यास, कुलगुरूंकडे अपील करता येईल आणि त्यांचा निर्णय अंतीम असेल.*<br>वरील नमुद परिनियमातील तरतुद पाहता नामनिर्देशन पत्राच्या वैधतेच्या संदर्भात कोणताही वाद किंवा शंका असल्यास कुलगुरूंकडे अपील करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. सदर अपीलाचा अधिकार पाहता हा निवडणुकीकरीता नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या व्यक्तींना देण्यात आल्याचे दिसते. सदर अपीलाच्या तरतुदीत नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या व्यक्तींच्या अनुषंगाने त्रयस्थ व्यक्तींना आक्षेप दाखल करावयाचा अधिकार दिलेला दिसुन येत नाही. त्याअर्थी प्रस्तुत त्रयस्थ पक्षाने दाखल केलेला आक्षेप हा तरतुदी शिवाय असल्याचे माझे मत झाले आहे.<br>**करीता सदर आक्षेप मी कोणत्याही आदेशा शिवाय निकाली काढत आहे.** |
| ३६ | राहूल वडमारे, जिल्हाध्यक्ष, रिपब्लिकन बहुजन सेना- त्रयस्थ पक्षाचा डॉ. गणेश माणिकराव अग्निहोत्री यांच्या | प्राचार्य | अपीलार्थी राहूल वडमारे हे सुनावणीसाठी स्वतः उपस्थित होते.<br>महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२) अनुसार अधिसभेवर निवडुन येणाऱ्या प्राचार्य गटातील सदस्यांच्या निवडणुकीकरीता प्राचार्य डॉ. गणेश माणिकराव अग्निहोत्री यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. सदर उमेदवारी अर्जावर त्रयस्थपक्ष राहूल वडमारे, जिल्हाध्यक्ष, रिपब्लिकन बहुजन सेना यांनी आक्षेप नोंदविला आहे व त्याद्वारे त्यांचा उमेदवारी अर्ज अवैध ठरवावा |

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University ★ Aurangabad ★

| | | | |
|---|---|---|---|
| | नामनिर्देशनपत्रावर आक्षेप | | अशी विनंती केली आहे. याबाबत महाराष्ट्र शासनाने दिनांक १७ मे, २०१७ च्या अधिसुचनेद्वारे जारी केलेल्या परिनियम-१/२०१७ मधील तरतुद क्रमांक १०(७) पुढील प्रमाणे आहे.<br>***१०. नामनिर्देशनपत्रे :- -------***<br>*(७) नामनिर्देशन पत्राच्या वैधतेच्या संदर्भात कोणताही वाद किंवा शंका असल्यास, कुलगुरूंकडे अपील करता येईल आणि त्यांचा निर्णय अंतीम असेल.*<br>वरील नमुद परिनियमातील तरतुद पाहता नामनिर्देशन पत्राच्या वैधतेच्या संदर्भात कोणताही वाद किंवा शंका असल्यास कुलगुरूंकडे अपील करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. सदर अपीलाचा अधिकार पाहता हा अधिकार निवडणुकीकरीता नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या व्यक्तींना देण्यात आल्याचे दिसते. सदर अपीलाच्या तरतुदीत नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या व्यक्तींच्या अनुषंगाने त्रयस्थ व्यक्तींना आक्षेप दाखल करावयाचा अधिकार दिलेला दिसुन येत नाही. त्याअर्थी प्रस्तुत त्रयस्थ पक्षाने दाखल केलेला आक्षेप हा तरतुदी शिवाय असल्याचे माझे मत झाले आहे.<br>**करीता सदर आक्षेप मी कोणत्याही आदेशा शिवाय निकाली काढत आहे.** |
| ३७ | सानप गोवर्धन कारभारी- त्रयस्थ पक्ष यांनी हंगे आबासाहेब श्रीरंग यांच्या प्राचार्य गटातील नामनिर्देशनपत्रावर आक्षेप नोंदविला आहे | प्राचार्य | अपीलार्थी सानप गोवर्धन कारभारी सुनावणीसाठी स्वतः उपस्थित आहेत.<br>महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२) अनुसार अधिसभेवर निवडुन येणाऱ्या प्राचार्य गटातील सदस्यांच्या निवडणुकीकरीता प्राचार्य डॉ. हंगे आबासाहेब श्रीरंग यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. सदर उमेदवारी अर्जावर त्रयस्थपक्ष सानप गोवर्धन कारभारी यांनी आक्षेप नोंदविला आहे व त्याद्वारे त्यांचा उमेदवारी अर्ज अवैध ठरवावा अशी विनंती केली आहे. याबाबत महाराष्ट्र शासनाने दिनांक १७ मे, २०१७ च्या अधिसुचनेद्वारे जारी केलेल्या परिनियम-१/२०१७ मधील तरतुद क्रमांक १०(७) पुढील प्रमाणे आहे.<br>***१०. नामनिर्देशनपत्रे :- -------***<br>*(७) नामनिर्देशन पत्राच्या वैधतेच्या संदर्भात कोणताही वाद किंवा शंका असल्यास, कुलगुरूंकडे अपील करता येईल आणि त्यांचा निर्णय अंतीम असेल.*<br>वरील नमुद परिनियमातील तरतुद पाहता नामनिर्देशन पत्राच्या वैधतेच्या संदर्भात कोणताही वाद किंवा शंका असल्यास कुलगुरूंकडे अपील करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. सदर अपीलाचा अधिकार पाहता हा अधिकार निवडणुकीकरीता नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या व्यक्तींना देण्यात आल्याचे दिसते. सदर अपीलाच्या तरतुदीत नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या व्यक्तींच्या अनुषंगाने त्रयस्थ व्यक्तींना आक्षेप दाखल करावयाचा अधिकार दिलेला दिसुन येत नाही. त्याअर्थी प्रस्तुत त्रयस्थ पक्षाने दाखल केलेला आक्षेप हा तरतुदी शिवाय असल्याचे माझे मत झाले आहे.<br>**करीता सदर आक्षेप मी कोणत्याही आदेशा शिवाय निकाली काढत आहे.** |

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

| | | | |
|---|---|---|---|
| ३८ | परदेशी राजेंद्र कचरू- त्रयस्थ पक्ष यांनी हांगे आबासाहेब श्रीरंग यांच्या प्राचार्य गटातील नामनिर्देशनपत्रावर आक्षेप नोंदविला आहे | प्राचार्य | परदेशी राजेंद्र कचरु सुनावणीस अनुपस्थित आहेत परंतु त्यांच्यावतीने प्रतिनिधी म्हणुन खराटे डी. एस. हजर आहेत.<br>महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२) अनुसार अधिसभेवर निवडुन येणाऱ्या प्राचार्य गटातील सदस्यांच्या निवडणुकीकरीता प्राचार्य डॉ. हांगे आबासाहेब श्रीरंग यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. सदर उमेदवारी अर्जावर त्रयस्थपक्ष परदेशी राजेंद्र कचरू यांनी आक्षेप नोंदविला आहे व त्याद्वारे त्यांचा उमेदवारी अर्ज अवैध ठरवावा अशी विनंती केली आहे. याबाबत महाराष्ट्र शासनाने दिनांक १७ मे, २०१७ च्या अधिसुचनेद्वारे जारी केलेल्या परिनियम-१/२०१७ मधील तरतुद क्रमांक १०(७) पुढील प्रमाणे आहे.<br>***१०. नामनिर्देशनपत्रे :- -------***<br>*(७) नामनिर्देशन पत्राच्या वैधतेच्या संदर्भात कोणताही वाद किंवा शंका असल्यास, कुलगुरूंकडे अपील करता येईल आणि त्यांचा निर्णय अंतीम असेल.*<br>वरील नमुद परिनियमातील तरतुद पाहता नामनिर्देशन पत्राच्या वैधतेच्या संदर्भात कोणताही वाद किंवा शंका असल्यास कुलगुरूंकडे अपील करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. सदर अपीलाचा अधिकार पाहता हा अधिकार निवडणुकीकरीता नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या व्यक्तींना देण्यात आल्याचे दिसते. सदर अपीलाच्या तरतुदीत नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या व्यक्तींच्या अनुषंगाने त्रयस्थ व्यक्तींना आक्षेप दाखल करावयाचा अधिकार दिलेला दिसुन येत नाही. त्याअर्थी प्रस्तुत त्रयस्थ पक्षाने दाखल केलेला आक्षेप हा तरतुदी शिवाय असल्याचे माझे मत झाले आहे.<br>**करीता सदर आक्षेप मी कोणत्याही आदेशा शिवाय निकाली काढत आहे.** |
| ३९ | मुरुमकर व्ही. डी. त्रयस्थ पक्ष यांनी मंगरुळे बसवराज विश्वनाथ यांच्या व्यवस्थापन प्रतिनिधी गटातील नामनिर्देशनपत्रावर आक्षेप नोंदविला आहे | व्यवस्थापन प्रतिनिधी | अपीलार्थी मुरुमकर व्ही. डी. सुनावणीसाठी उपस्थित आहेत.<br>महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२) अनुसार अधिसभेवर निवडुन येणाऱ्या व्यवस्थापन प्रतिनिधी गटातील सदस्यांच्या निवडणुकीकरीता मंगरुळे बसवराज विश्वनाथ यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. सदर उमेदवारी अर्जावर त्रयस्थपक्ष मुरुमकर व्ही. डी. यांनी आक्षेप नोंदविला आहे व त्याद्वारे त्यांचा उमेदवारी अर्ज अवैध ठरवावा अशी विनंती केली आहे. याबाबत महाराष्ट्र शासनाने दिनांक १७ मे, २०१७ च्या अधिसुचनेद्वारे जारी केलेल्या परिनियम-१/२०१७ मधील तरतुद क्रमांक १०(७) पुढील प्रमाणे आहे.<br>***१०. नामनिर्देशनपत्रे :- -------***<br>*(७) नामनिर्देशन पत्राच्या वैधतेच्या संदर्भात कोणताही वाद किंवा शंका असल्यास, कुलगुरूंकडे अपील करता येईल आणि त्यांचा निर्णय अंतीम असेल.*<br>वरील नमुद परिनियमातील तरतुद पाहता नामनिर्देशन पत्राच्या वैधतेच्या संदर्भात कोणताही वाद किंवा शंका असल्यास कुलगुरूंकडे अपील करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. सदर अपीलाचा अधिकार पाहता हा अधिकार निवडणुकीकरीता नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या व्यक्तींना देण्यात आल्याचे दिसते. सदर अपीलाच्या तरतुदीत नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या व्यक्तींच्या अनुषंगाने त्रयस्थ व्यक्तींना |

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

| | | | |
|---|---|---|---|
| | | | आक्षेप दाखल करावयाचा अधिकार दिलेला दिसुन येत नाही. त्याअर्थी प्रस्तुत त्रयस्थ पक्षाने दाखल केलेला आक्षेप हा तरतुदी शिवाय असल्याचे माझे मत झाले आहे.<br>**करीता सदर आक्षेप मी कोणत्याही आदेशा शिवाय निकाली काढत आहे.** |
| ४० | चौधरी अनंत अश्रुबा त्रयस्थ पक्ष | अभ्यासमंडळ (शिक्षणशास्त्र) | अपीलार्थी चौधरी अनंत अश्रुबा यांच्यावतीन प्रतिनिधी उपस्थित आहेत.<br>महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ४०(२)(ग) अनुसार अभ्यासमंडळ निवडणुकीकरीता १. डॉ. शेख इमारन शेख रमजान, २. डॉ. मिर्झा मैफुज बेग कमेर बेग व ३. डॉ. कनीज फातीमा यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.<br>सदर उमेदवारी अर्जावर त्रयस्थपक्ष डॉ. चौधरी अनंत अश्रुबा यांनी आक्षेप नोंदविला आहे व त्याद्वारे त्यांचे उमेदवारी अर्ज अवैध ठरवावा अशी विनंती केली आहे. याबाबत महाराष्ट्र शासनाने दिनांक १७ मे, २०१७ च्या अधिसुचनेद्वारे जारी केलेल्या परिनियम-१/२०१७ मधील तरतुद क्रमांक १०(७) पुढील प्रमाणे आहे.<br>***१०. नामनिर्देशनपत्रे :- -------***<br>*(७) नामनिर्देशन पत्राच्या वैधतेच्या संदर्भात कोणताही वाद किंवा शंका असल्यास, कुलगुरूंकडे अपील करता येईल आणि त्यांचा निर्णय अंतीम असेल.*<br>वरील नमुद परिनियमातील तरतुद पाहता नामनिर्देशन पत्राच्या वैधतेच्या संदर्भात कोणताही वाद किंवा शंका असल्यास कुलगुरूंकडे अपील करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. सदर अपीलाचा अधिकार पाहता हा अधिकार निवडणुकीकरीता नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या व्यक्तींना देण्यात आल्याचे दिसते. सदर अपीलाच्या तरतुदीत नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या व्यक्तींच्या अनुषंगाने त्रयस्थ व्यक्तींना आक्षेप दाखल करावयाचा अधिकार दिलेला दिसुन येत नाही. त्याअर्थी प्रस्तुत त्रयस्थ पक्षाने दाखल केलेला आक्षेप हा तरतुदी शिवाय असल्याचे माझे मत झाले आहे.<br>**करीता सदर आक्षेप मी कोणत्याही आदेशा शिवाय निकाली काढत आहे.** |
| ४१ | डॉ. सय्यद इकबाल मजाज सय्यद अली हादी – त्रयस्थपक्ष यांचे अभ्यासमंडळ (समाजशास्त्र) प्राधिकरणाच्या डॉ. रामटेके पुरुषोत्तम वारलू यांच्या उमेदवारी अर्जावर आक्षेप | अभ्यासमंडळ (समाजशास्त्र) | अपीलार्थी डॉ. सय्यद इकबाल मजाज सय्यद अली हादी सुनावणीसाठी अनुपस्थित आहेत.<br>महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ४०(२)(ग) अनुसार समाजशास्त्र अभ्यासमंडळ निवडणुकीकरीता डॉ. रामटेके पुरुषोत्तम वारलू यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. सदर उमेदवारी अर्जावर त्रयस्थपक्ष डॉ. सय्यद इकबाल मजाज सय्यद अली हादी यांनी आक्षेप नोंदविला आहे व त्याद्वारे त्यांचा उमेदवारी अर्ज अवैध ठरवावा अशी विनंती केली आहे. याबाबत महाराष्ट्र शासनाने दिनांक १७ मे, २०१७ च्या अधिसुचनेद्वारे जारी केलेल्या परिनियम-१/२०१७ मधील तरतुद क्रमांक १०(७) पुढील प्रमाणे आहे.<br>***१०. नामनिर्देशनपत्रे :- -------***<br>*(७) नामनिर्देशन पत्राच्या वैधतेच्या संदर्भात कोणताही वाद किंवा शंका असल्यास, कुलगुरूंकडे अपील करता येईल आणि त्यांचा निर्णय अंतीम असेल.*<br>वरील नमुद परिनियमातील तरतुद पाहता नामनिर्देशन पत्राच्या वैधतेच्या संदर्भात कोणताही वाद किंवा शंका असल्यास कुलगुरूंकडे |

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

| | | | |
|---|---|---|---|
| | | | अपील करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. सदर अपीलाचा अधिकार पाहता हा अधिकार निवडणुकीकरीता नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या व्यक्तींना देण्यात आल्याचे दिसते. सदर अपीलाच्या तरतुदीत नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या व्यक्तींच्या अनुषंगाने त्रयस्थ व्यक्तींना आक्षेप दाखल करावयाचा अधिकार दिलेला दिसुन येत नाही. त्याअर्थी प्रस्तुत त्रयस्थ पक्षाने दाखल केलेला आक्षेप हा तरतुदी शिवाय असल्याचे माझे मत झाले आहे.<br>**करीता सदर आक्षेप मी कोणत्याही आदेशा शिवाय निकाली काढत आहे.** |

दिनांक :- २५-११-२०२२
विद्यापीठ प्रांगण, औरंगाबाद.

**कुलगुरू तथा**
**निवडणूक अपिलीय अधिकारी**

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

# कुलगुरू तथा निवडणूक अपिलीय अधिकारी
# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

(महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदींन्वये विविध प्राधिकरणांच्या निवडणुका-२०२२)

विद्यापीठाने विविध प्राधिकरणांच्या निवडणुकांकरिता विविध गटांच्या उमेदवार याद्या छाननी करून जाहीर केल्या आहेत.

विद्यापीठ अध्यापक गटातून अधिसभेवर निवडून जावयाच्या सदस्यांकरिता नामनिर्देशनपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यापैकी वैध नामनिर्देशन ठरलेल्या उमेदवारांपैकी डॉ. गौरी फराह नाझ यांनी हुंबे वीणा राजेंद्र यांचे उमेदवारी अर्ज वैध केल्याच्या बाबतीत आक्षेप नोंदवून त्यांचे नामनिर्देशन अवैध ठरविण्याची विनंती केली आहे.

सदर प्रकरणातील "विशेष परिस्थिती" लक्षात घेता सुनावणीच्या उद्देशाने डॉ. गौरी फराह नाझ यांच्यासह डॉ. हुंबे वीणा राजेंद्र यांनाही बोलविण्यात आले व सविस्तरपणे बाजू मांडण्याची संधी देण्यात आली.

अपिलार्थी डॉ. गौरी फराह नाझ व डॉ. हुंबे वीणा राजेंद्र यांनी सुनावणीदरम्यान मांडलेले मुद्यांचा सविस्तर विचार करून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| अ.क्र. | अपिलकर्त्याचे नाव | गट | निर्णय |
|---|---|---|---|
| १ | डॉ. गौरी फराह नाझ (डॉ. हुंबे वीणा राजेंद्र यांच्या संदर्भात) | विद्यापीठ अध्यापक | सुनावणी करीता डॉ. गौरी फराह नाझ व डॉ. हुंबे विना राजेंद्र हजर आहेत.<br>महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२) अनुसार अधिसभेवर निवडुन येणाऱ्या विद्यापीठ अध्यापक गटातील सदस्यांच्या निवडणुकीकरीता हुंबे वीणा राजेंद्र यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.<br>निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सादर केलेले अभिलेख तपासले असता विद्यापीठ अध्यापक मतदारांची यादीतील ॲप्लिकेशन आयडी क्र. बी-१५३ वर "कोठुळे वीणा मधुकर" असे नाव नमूद आहे. सदर यादीत "हुंबे वीणा राजेंद्र" हे नाव कोठेही आढळून येत नाही. याशिवाय हुंबे यांनी त्यांच्या नामनिर्देशनपत्रासोबत त्यांचे नाव बदलल्याचे शासन राजपत्राची छायांकित प्रत जोडली आहे व त्याअर्थी त्यांचे नाव बदलले असल्याची त्यांनी स्वत: कबुली दिली आहे. सदर राजपत्र हे दि. ०१-०४-२००४ रोजी प्रसिद्ध झालेले आहे. म्हणजेच दि. ११-०७-२०२२ रोजी सदर गटातील मतदार यादीत नाव नोंदविताना त्यांचे नाव बदललेले आहे हे त्यांना माहित असूनही त्यांच्या नावाची नोंदणी "कोठुळे वीणा मधुकर" या नावाने केली आहे. त्यामुळे त्यांना आता विद्यापीठ अध्यापक मतदार यादीत समाविष्ट नसलेल्या "हुंबे वीणा राजेंद्र" या नावाने नामनिर्देशनपत्र सादर करता येणार नाही असे माझे मत झाले आहे.<br>**करीता, उपलब्ध अभिलेख तपासणीअंती निदर्शनास आलेल्या बाबी दुरुस्त होणे आवश्यक असल्याची माझी धारणा असल्याने मी "हुंबे वीणा राजेंद्र" यांचे नामनिर्देशन अवैध ठरवित आहे.** |

दिनांक :- २५-११-२०२२
विद्यापीठ प्रांगण, औरंगाबाद.

**कुलगुरू तथा**
**निवडणूक अपिलीय अधिकारी**

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University ★ Aurangabad ★